शुक्रवार, दि. ४ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २४१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# अनाधिकृत होर्डिंग्ज्‌बाबत मनपाची दुटप्पी भुमिका

## धार्मिक तेढ निर्माण करण्याचा मनपा अधिकाऱ्यांचा मानस ?

**जालना । प्रतिनिधी -** अनाधिकृत होर्डिंग्ज्‌बाबत मनपाची दुटप्पी भूमिका उघड होत आहे. अवघ्या जालना शहरात ठिकठिकाणी बेकादेशीररित्या अनाधिकृत होर्डिंग्ज लागलेले आहेत. यात बहुतांश होर्डिंग्ज ह्या कोचिंग क्लासेस तसेच व्यावसायिक आहेत. असे असतांना अंबड चौफुली परिसरातील काही होर्डिंग्ज्‌वर कारवाई करण्याचा प्रयत्न मनपा प्रशासनाने केला आहे. मुळात ते होर्डिंग धार्मिक कार्यक्रमाचे आहे. त्यामुळे मनपाच्या मालमत्ता विभागाच्या अधिकाऱ्यांना जालना शहरात धार्मिक तेढ निर्माण करायचे आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो आहे.

अंबड चौफुली पसिरातील होर्डिंग काढण्याच्या कारणावरून मोठा वाद निर्माण होण्याची शक्यता गुरुवार (दि ३) रोजी निर्माण झाली होती. राम नवमीच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने शहरात लागलेले चार होर्डिंग मनपान हटवले. होर्डिंग लावणाऱ्या कार्यक्रमाच्या आयोजकांनी याबाबत स्पष्ट केले आहे की, जे अनाधिकृत वीजेच्या खाबांवर लावलेले असले ते होर्डिंग्ज काढल्यास आमची हरकत नाही मात्र, त्यांनी मोठाले अधिकृत लावलेले होर्डिंग्ज का काढले? याचे उत्तर मनपा प्रशासनाने द्यावे. शहरभरात अनाधिकृत होर्डिंग्ज लागलेले असतांना केवळ एका विशिष्ट होर्डिंगवर कारवाईचा बडगा मनपा प्रशासनाचा हेतू स्पष्ट करतो आहे. या सर्व प्रकाराची जिल्हाधिकारी यांनी गांभीर्याने दखल घेऊन मनपाच्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन कारवाई करावी अशी मागणी श्री रामभक्तांकडून होत आहे.



## जिल्ह्यात ४ एप्रिल रोजी ‘पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा’

**जालना** - जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना अणि मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना यांचे संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. ४ एप्रिल, २०२५ रोजी मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अंकुशराव टोपे महाविद्यालय, सिरसवाडी रोड, रेल्वे उड्डाण पुलाशेजारी, जालना येथे सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत ‘पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा’ आणि ‘मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण भरती मेळावा’ आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात दहावी/बारावी/आय.टी.आय./बी.ए./बी.कॉम/बी.एससी/डिप्लोमो/डिप्लोमा ग्री/बी.एस.सी. ग्री/एम.एस.सी. ग्री/एम.बी.ए. इत्यादी पात्रता धारक नोकर इच्छुक उमेदवारासाठी एकुण २०४ रिक्त पदे उपलब्ध असून, मुलाखतीसाठी विविध ८ कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

या रोजगार मेळाव्या मध्ये प्रीम सोल्यूशन प्रा. लि. (सलाम किसान) जालना यांची १८ पदे, प्रीम सोल्यूशन प्रा. लि. जालना यांची २२ पदे, कलश सीड्स प्रा. लि. जालना यांची २५ पदे, एस.बी.आई इन्शुरेंस कंपनी लि. जालना



यांची १० पदे, राजुरी स्टील्स टी एम टी बार्स प्रा. लि. जालना यांची २० पदे, प्रथम एजुकेशन फाउंडेशन छ. संभाजीनगर यांची ६० पदे, रिध्दी सिध्दी सर्व्हिसेस, जालना यांची २९ पदे, भाग्य लक्ष्मी रोलींग मिल्स प्रा. लि. जालना यांची २० पदे, असे एकूण २०४ रिक्त पदे उपलब्ध आहेत. या मेळाव्यासाठी वरील ८ नामांकित कंपन्यांचे नियुक्ती अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहणार असुन, पात्र उमेदवारांच्या चाचणी व मुलाखती घेऊन विविध पदांच्या रिक्त जागांसाठी निवड व भरती करणार आहेत.

या सुवर्ण संधीचा रोजगार इच्छुक जिल्यातील जास्तीत-जास्त उमेदवारांनी लाभ घ्यावा आणि किमान पाच प्रतीत रिझ्युमे/बायोडाटा, शैक्षणिक कागदपत्रे आणि आधार कार्ड/सेवायोजन नोंदणी छायाप्रतीसह सकाळी ९ वाजता उपस्थित रहावे. नोकरी इच्छुक उमेदवारांनी अद्यापपर्यत सेवायोजन नोंदणी केली नसल्यास

तसेच www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोकरी साधक म्हणून नोंदणी करावी. तसेच, यापुर्वी महारोजगार वेबपोर्टलवर नोंदणी केली असल्यास वरील सुधारीत संकेतस्थळावर आपला १५ अंकी नोंदणी क्रमांक टाकून लॉगीन करावे आणि मोबाईल व आधार क्रमांक पडताळणी करावी. तसेच या वेबपोर्टलवर लॉग-इन करुन जॉबफ ेअर टॅबवर क्लिक करुन पंडीत दीनदयाळ उपाध्यायरोजगार मेळाव्यामध्ये जाऊन पात्रते प्रमाणे विविध कंपन्याच्या उपलब्ध रिक्त पदांसाठी ॲप्लाय करावे, यासाठी काही अडचण आल्यास कार्यालयीन दुरध्वनी व व्हॉटस्अप क्रमांक ०२४८२-२९९०३३ वर संपर्क करावा असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, गणेश चिमणकर यांनी केले आहे.

रामगनर साखर कारखाना

# लिलाव प्रक्रिया रद्द व्हायला हवी होती - अंजली दमानिया

### शेतकरी व कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत लढा देण्याचा दमानिया यांचा निर्धार; ईडीची चौकशी पुन्हा सुरु करा

**जालना । प्रतिनिधी -** यंत्रणांचा गैरवापर करून राज्यभरात सध्या लूट, लूट, लूट आणि फक्त लूट सुरू आहे. बीड, जालन्यात जे सुरु आहे हा अन्याय आहे. रामनगर साखर कारखाना प्रकरणात जी लिलाव प्रक्रिया झाली ती बेकायदेशीररित्या झाली असल्याचा आरोप करत ती प्रक्रिया रद्द व्हायला हवी होती असे म्हणत सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी शेतकरी व कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत लढा देण्याचा निर्धार येथे केला आहे.

रामनगर भागात एका लॉन्सवर गुरुवार (दि ३) रोजी आयोजित शेतकरी व कामगार संवाद मेळाव्यात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर अंकुशराव देशमुख, श्री हेकाडे यांच्यासह रामनगर साखर कारखाना बचाव कृती समितीचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पक्ष प्रवेशावर टिका केली. पुढारी आज एका पक्षात तर दुसऱ्या दिवशी सकाळी दुसऱ्याच पक्षात तर रात्री काही वेगळेव वक्तव्य करतो त्या मुळे पुढाऱ्यांवर कुणालाही विश्वास राहीलेला नाही. कोणीच कामे करत नाहीत. एडीआय संस्थेच्या रिपोर्ट नुसार २८८ निवडलेल्या सदस्यांपैकी ११८ सदस्य हे गुन्हेगारी आरोप असलेले आहेत. यांच्यावर गंभीर असे खून, खूनाचा प्रयत्न, अत्याचार असे आरोप आहेत. हे लोकं तेथे बसून कायदा करताहेत. मंत्रालयात सहा




वाजेनंतर सभ्य लोकांना जाता येत नाही. आयपीएस सारख्या उच्चशिक्षित लोकांना यांना सलाम ठोकावा लागतो ही शोकांतिका आहे.

बीएमसी-टीएमसी बाबत येथे सामान्या लोकांची घरे ही पडीक झाल्याचे सांगून त्यांची वीज- पाणी बंद केल्या जाते व कालांतराने त्या जमिनी बिल्डरांच्या घशात घातल्या जात आहे. शेतकऱ्यांच्या कोटींच्या जमिनी ह्या लाखांत घेऊन त्यांची फसवणूक केली जात आहे. यांना राजकीय वरदहस्त आहे.

ज्या धनंजय मुंडेचे माणसे हे करताहेत सर्व राजकारणी एकच आहे४त. राजेंद्र घनवट, धनजंय मुंडे, संजय खोतकर हे एकाच फोटो फ्रेम मध्ये पहायला मिळालेले आहेत.

१९८०-८५ च्या सुमारास २३५ एकर जागेवर झालेल्या साखर कारखान्यात १०० एकर जमिन शासनाची आहे तर १३५ एकर जमिनी शेतकऱ्यांची आहे. राज्य सरकार-केंद्र सरकार आणि शेतकरी यांची ही प्रॉपर्टी आहे. या कारखान्यावर ११ कोटींचे कर्ज होते. त्यावर व्याज लावून लावून एनपीएत टाकण्यात आले. साखर कारखाने घशात घालणारी टोळी ही अजित पवारांची असल्याचा गंभीर आरोपही दमानिया यांनी यावेळी केला असून यात सर्वपक्षीय सहभाग असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

जागेचे मुल्यांकन, मालमत्ता किती, त्याचे दायित्व कुणाचे हे सर्व पाहायला हवे, शेतकऱ्यांची शेती - कामगारांच्या पगारी, भविष्य निर्वाह निधी, या सर्व बाबी ह्या बोली लावतांना विचारात घेणे आवश्यक असते. कर्ज ११ कोटी एनपीए गेल्यानंतर ३५ कोटी झाले आणि लिलावात बोली लागली ४२ कोटींची. हा लिलावच मुळात बेकायदेशीर असल्याचा आरोप पान २ वर

### सत्याची दहशत

अंजली दमानिया यांनी म्हटले की मी जालन्यात येणार हे समजल्यावर दोन ठिकाणं ही रद्द करण्यात आली. म्हणजे ती केली गेली. आता तिसऱ्या ठिकाणी हा कार्यक्रम घेण्यात आला या जागेबाबत गोपनियता बाळगण्यात आली. ऐन वेळी ठिकाण कळविल्याने कार्यक्रम पार पडत आहे. ही सत्याची ताकद आहे. तुम्ही राजकारणी खिशात ठेवा. जनता एक झाल्यावर काय होते ते आता दाखवून देऊ असा ईशाराही दमानिया यांनी दिला.

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना

## अयोध्या यात्रेसाठी विशेष रेल्वे; जिल्ह्यातील ८०० लाभार्थी करणार प्रस्थान

**जालना । प्रतिनिधी -** सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाचा शासन निर्णयानुसार राज्यातील ज्येष्ठ नागरिक जे ६० वर्ष किंवा त्याहुन अधिक वयाच्या जेष्ठ नागरिकांना भारतातील तीर्थक्षेत्रांना भेट देण्याकरीता मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना महाराष्ट्र शासनामार्फत सुरु करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यातील ८०० लाभार्थ्यांना रविवार, दि. ६ एप्रिल, २०२५ ते दिनांक १० एप्रिल, २०२५ या कालावधीत जालना येथुन अयोध्या श्रीराम मंदीर यात्रेसाठी विशेष रेल्वे प्रस्थान करणार आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व इतर अधिकारी, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.




यात्रेसाठी जिल्ह्यातील पहिल्या टप्प्यातील ८०० लाभार्थ्यांना तीर्थ दर्शनासाठी नेण्यात येणार असुन, सदर लाभार्थ्यांची यापुर्वी जिल्हास्तरीय समितीने निवड केली आहे. सदर पात्र लाभार्थ्यांची यादी सहायक आयुक्त समाजकल्याण कार्यालय जालना येथे लावण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पात्र लाभार्थ्यांने तीर्थदर्शन यात्रेसाठी आपल्या सोबत वैद्यकीय प्रमाणत्र, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो व आवश्यकता असल्यास औषधे व इतर आवश्यक वस्तु सोबत ठेवाव्यात असे आवाहन सहायक आयुक्त समाजकल्याण यांनी केले आहे.

# जालन्यात मराठवाड्यातील पहिले पर्यावरणपूरक बांबू वस्तूंचे प्रदर्शन

### महेश भवनात ११ ते १३ एप्रिलदरम्यान आयोजन; बांबू हस्तकला उद्योगावर मान्यवरांची चर्चासत्रे

**जालना । प्रतिनिधी -** रानउद्योग फार्मर प्रोड्युसर कंपनी जालना आणि वेणूवेध बांबू संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जालना येथे महाराष्ट्रातील पहिले पर्यावरणपूरक तीन दिवसीय बांबू वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्री महोत्सव ११ ते १३ एप्रिल या कालावधीत मंठा रोडवरील महेश भवन येथे दररोज १०.३० ते रात्री ९ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. या ठिकाणी शेतकरी, उद्योजक व आर्किटेक्ट यांचा अनोखा संगम बघायला मिळणार आहे, माहिती निमंत्रक डॉ. सुयोग कुलकर्णी यांनी दिली.

या बांबू वस्तू प्रदर्शन व विक्री महोत्सवाचे उद्घाटन आय. सी. टी. मुंबईचे कुलपती पद्मविभूषण प्रोफेसर जे. बी. जोशी यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य अंदाज समितीचे अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री आ. अर्जुनराव खोतकर राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून आय.सी.टी. मुंबईचे कुलगुरू प्रो. ए. के. पंडित, महाराष्ट्र कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशाभाई पटेल, आयसीटीच्या मराठवाडा कॅम्पसचे डायरेक्टर प्रो. एस. टी. म्हस्के, आ. हिकमत उढाण, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, माजी मंत्री राजेश टोपे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार, जालना महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, माजी आमदार अरविंदराव चव्हाण, जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती भास्करराव दानवे, विनोदराय इंजिनिअरिंगचे सुनील रायठठ्ठा, पान २ वर



## संपादकीय

# युनूस यांची नसती उठाठेव

बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांना पदच्युत केल्यानंतर नोबेल पारितोषिक विजेते मोहंमद युनूस यांची बांगलादेशच्या अंतरिम सरकारच्या मुख्य सल्लागारपदी निवड करण्यात आली. मोहंमद युनूस यांची बांगलादेश सरकारच्या मुख्य सल्लागारपदी निवड झाल्यावर भारताने त्याचे स्वागतच केले. त्यांच्या कारकिर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील असे भारताला वाटले होते पण त्यांनी भारताशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचे सोडाच उलट भारताशी पंगा घेण्याचेच त्यांनी ठरवले आहे. मोहंमद युनूस हे पाकिस्तान आणि चीनच्या कच्छपी लागले असून भारताला पाण्यात पाहत आहे. त्यांच्या कारकिर्दीत भारत बांगलादेश संबंध सुधारण्याऐवजी बिघडतच चालले आहे. मोहंमद युनूस हे सत्तेवर आल्यापासून काही ना काही कारणाने भारताची कुरापत काढून भारताशी पंगा घेत आहेत याआधी त्यांनी जमाते इस्लामी या कट्टरपंथीय संघटनेवर घातलेली बंदी उठवली. याच संघटनेने बंदी उठल्यानंतर बांग्लादेशात अल्पसंख्यांक असलेल्या हिंदू धर्मीय नागरिकांवर हल्ले केले. भारताने हे हिंदूंवर होणारे हल्ले रोखवेत अशी विनंती त्यांच्याकडे केली पण त्यांनी त्याकडे सोईस्कर दुर्लक्ष केले त्यामुळे दोन्ही देशातील संबंध बिघडले हे संबंध पूर्ववत करण्या ऐवजी ते हे संबंध कसे बिघडतील हेच पाहत राहिले. भारताला डिवचण्यासाठी त्यांनी पाकिस्तान आणि चीनला जवळ केले. काही दिवसापूर्वी पाकिस्तानच्या गुप्तहेर संघटनेचे म्हणजे आय एस आय चे चार अधिकारी बांगलादेश दौऱ्यावर गेले होते. या अधिकाऱ्यांचे बांग्लादेशात जंगी स्वागत करण्यात आले. या अधिकाऱ्यांनी मोहंमद युनूस यांच्याशी चर्चा केली या चर्चेचा अजेंडा काय होता हे समोर आले नसले तरी यात काय चर्चा झाली असेल हे सांगायला तज्ज्ञांची गरज नाही. या चर्चेनंतर मोहंमद युनूस यांनी पाकिस्तानचे तोंडभरून कौतुक केले. भारताने यावर थेट मतप्रदर्शन केले नसले तरी त्यांनी पाकला जवळ करून भारताला खिजवले हे मात्र नक्की. पाकला जवळ करत भारताशी पंगा घेऊन मोहंमद युनूस शांत बसले नाही आता तर त्यांनी थेट भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान दिले आहे. मोहंमद युनूस हे चार दिवसीय चीनच्या दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्यात त्यांनी चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्यासोबत ९ करार केले. जे करताना त्यांनी चीनला खुश करण्याचा नादात थेट भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान दिले. या दौऱ्यात त्यांनी म्हंटले आहे की भारताच्या पूर्वोत्तर राज्यांना समुद्र लागून नाही. ही राज्ये पूर्णपणे जमिनीनी वेढलेली असल्याने चीनने या संधीचा फायदा घेऊन आपला प्रभाव वाढवावा. हे वक्तव्य करून त्यांनी एकप्रकारे चीनला भारताच्या ईशान्येकडील राज्यावर आक्रमण करावे असे चिथावले आहे. इतके करून ते थांबले नाही तर ते पुढे म्हणतात भारताच्या ईशान्येकडील राज्यांना केवळ जमीन आहे त्यांना समुद्र नाही. समुद्र फक्त बांगलादेशला आहे. समुद्राचे स्वामित्व फक्त बांगलादेश कडेच आहे आणि बांगलादेश हाच समुद्राचा रक्षक आहे. मोहंमद युनूस यांचे हे वक्तव्य अतिशय आक्षेपार्ह आणि निषेधार्ह आहे. त्यांचे हे वक्तव्य म्हणजे भारताला घेराव घालण्यासाठी चीनला आव्हान करणारे आहे. मोहंमद युनूस यांचे हे चिथावणीखोर वक्तव्य भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणारेच आहे. ईशान्य भारताच्या सुरक्षिततेसाठी बांगलादेश सरकारचा हा दृष्टिकोन अत्यंत धोकादायक आहे. भारत सरकारने मोहंमद युनूस यांच्या या वक्तव्याची कडक शब्दात निंदा करायला हवी. ज्या बांगलादेशसारखा देश ज्याच्या स्वातंत्र्याला भारताने मदत केली तोच देश आता भारताच्या विरोधात जात आहे इतकेच नाही तर थेट भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देत आहे हे दुर्दैवी आहे याला आळा बसायला हवा त्यासाठी बांगलादेशला त्यांची जागा दाखवून द्यायला हवी. बांगलादेशने त्यांची ही नसती उठाठेव बंद केली नाही तर भारत त्यांना त्यांची जागा दाखवून देईल असा इशाराच भारताने बांगलादेशला द्यायला हवा.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# भल्या भल्या मुघल साम्राज्यांची दाणादाण!

छ.शिवाजी महाराजांबद्दल पंडित नेहरू आपल्या डिस्कवरी ऑफ इंडिया- भारताचा शोध या ग्रंथात म्हणतात, छत्रपती शिवाजी प्रतिहल्ला करणाऱ्या हिंदू राष्ट्रवादाचे प्रतीक होते. जुन्या इतिहासातून त्यांनी प्रेरणा मिळविली. महाराज अत्यंत धैर्यशील आणि उत्कृष्ट नेतृत्वगुण असणारे नेते होते. त्यांनी स्वराज्यासाठी चिवटपणे लढणारा गट म्हणून मराठी जनांना एकत्र केले. त्यांच्यामागे राष्ट्रीयत्वाची पार्श्वभूमी उभी केली आणि या गटास अशी चेतना दिली, की या गटाशी धडका घेत मुघल साम्राज्य अखेर मोडकळीस आले. छत्रपतींचा मृत्यू १६८०मध्ये झाला तरी त्यांच्यानंतर संपूर्ण भारतावर प्रभुत्व प्रस्थापित होईपर्यंत मराठ्यांचा राज्यविस्तार होतच राहिला. रयतेच्या या जाणत्या छत्रपतींच्या प्रेरक स्मृती जागविणारा लेख.

छत्रपती शिवाजीराजे भोसले हे मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. भोसले कुळातील या राजाने विजापूरच्या आदिलशाही आणि मोगल साम्राज्य यांच्याविरुद्ध संघर्ष करून मराठा स्वराज्य स्थापन केले. रायगड ही राजधानी असलेले स्वतंत्र मराठा राज्य त्यांनी उभे केले आणि इ.स. १६७४ मध्ये छत्रपती म्हणून राज्याभिषेक करवून घेतला. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छ.शिवरायांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. भौगोलिक ज्ञानाचा उपयोग करून आश्चर्यजनक वेगवान हालचालीने बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खचविले. नेमके हल्ले यांचा वापर करून गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी यशस्वीपणे वापरले. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या दोन हजार सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर छत्रपतींनी उभे केले. किनारी आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले. राज्य कारभारात मराठी भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. अख्ख्या महाराष्ट्रात ते शिवाजीराजा, शिवाजीराजे, शिवबा, शिवबाराजे, शिवराय अशा अनेक नावांनी ओळखले जातात. शिवाजी महाराजांचा जन्मदिवस हा शिवजयंती म्हणून साजरा होतो. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांचा संयुक्त उल्लेख शिवशंभू असा होतो. सर्वच इतिहासकार सर्वसाधारणपणे शिवाजी महाराजांचा जन्म वर्ष १६३० ते औरंगजेबाचा मृत्यू वर्ष १७०७ यादरम्यानच्या ७७ वर्षांच्या काळास शिवकाल असे म्हणतात.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरानजीक वसलेल्या शिवनेरी या डोंगरी किल्ल्यावर दि.१९ फेब्रुवारी १६३०मध्ये छत्रपती शिवरायांचा जन्म झाला. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला जिजामातेंनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा, अशी प्रार्थना केली होती. म्हणून या मुलाचे नाव शिवाजी ठेवले गेले. शिवबांच्या जन्माच्या वेळी दख्खनमधील राजसत्ता ही विजापूर, अहमदनगर व गोवळकोंडा या तीन मुसलमानी सल्तनतींमध्ये विभागली होती. शहाजीराजांनी आपली निष्ठा वेळोवेळी अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही आणि मुघल यांच्यादरम्यान बदलली; पण त्यांनी पुणे ही नेहमीच आपली जहागिरी ठेवली व स्वतःची एक लहानशी फौज पदरी बाळगली होती. इ.स.१६४७मध्ये सतरा वर्षांच्या शिवरायांनी आदिलशहाच्या ताब्यातला तोरणगड जिंकला आणि स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. तोरणगड हेच स्वराज्याचे तोरण ठरले. त्याच साली त्यांनी कोंढाणा- सिंहगड आणि पुरंदर हे किल्ले आदिलशहाकडून जिंकून पुणे प्रांतावर पूर्ण नियंत्रण मिळवले. या शिवाय तोरणगडासमोरील मुरुंबदेवाचा डोंगर जिंकून त्याची डागडुजी केली. त्याचे नवे नाव त्यांनी राजगड असे ठेवले. राजे जेव्हा पुण्याचा कारभार पाहू लागले, तेव्हा त्यांनी स्वतःची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली. ही राजमुद्रा संस्कृत भाषेत होती. तिचा मराठी अर्थ- ज्याप्रमाणे प्रतिपदेचा चंद्र वाढत जातो, आणि साऱ्या विश्वात वंदनीय होतो, तशीच शहाजींचा पुत्र शिवाजींची ही मुद्रा व तिचा लौकिक वाढत जाईल.

होतही गेले तसेच! एकेक किल्ले जिंकत राहिल्यामुळे इ.स.१६५९ साली आदिलशहाने दरबारात शिवाजी महाराजांना संपविण्याचा विडा ठेवला. हा विडा दरबारी असलेल्या अफझलखान नावाच्या सरदाराने उचलला. मोठ्या सैन्यासह आणि लवाजम्यासह तो मोहिमेवर निघाला. अफझलखान वाईजवळ आला, तेव्हा शिवाजीराजांनी सह्याद्रीच्या महाबळेश्वरजवळ असलेल्या प्रतापगडावरून त्यास तोंड देण्याचे ठरवले. तहाची बोलणी सुरू झाली आणि अंतिम बोलणीसाठी शिवाजी महाराजांनी स्वतः यावे, असा खानचा आग्रह होता. पण राजेंचे वकिल- पंताजी गोपीनाथ बोकील यांनी खानाला गळ घालून प्रतापगडावरच भेट घेण्यास बोलावले. भेटीच्या नियमांनुसार दोन्ही पक्षांकडील मोजकीच माणसे भेटीसाठी येतील, दरम्यान सर्वांनी निःशस्त्र राहण्याचे ठरले. शिवाजीराजांना खानच्या दगाबाजपणाची कल्पना असल्यामुळे त्यांनी सावधगिरी म्हणून चिलखत चढविले. सोबत बिचवा तसेच वाघनखे ठेवली. बिचवा चिलखतामध्ये दडविला होता, तर वाघनखे हाताच्या पंजाच्या आतमध्ये वळविलेली असल्यामुळे दिसत नव्हती. महाराजांसोबत जिवा महाला हा विश्वासू सरदार होता, तर अफझलखानसोबत सय्यद बंडा हा तत्कालीन प्रख्यात असा दांडपट्टेबाज होता. प्रताप गडावरील एका छावणीत भेट ठरली. भेटीच्या वेळी उंचपुऱ्या, बलदंड खानाने छत्रपतींना मिठी मारली. राजांचे प्राण कंठाशी आले, त्याच वेळी खानने कट्यारीचा वार महाराजांवर केला, परंतु चिलखतामुळे राजे बचावले. अफझलखानाचा दगा पाहून शिवाजीराजांनी वाघनखे खानाच्या पोटात खुपसली. त्याचबरोबर खानाची प्राणांतिक आरोळी चहूकडे गुंजली. सय्यद बंडाने तत्क्षणी राजांवर दांडपट्ट्याचा जोरदार वार केला, जो तत्पर जिवा महालाने स्वतःवर झेलून शिवाजीराजांचे प्राण वाचले. यामुळेच होता जिवा म्हणून वाचला शिवा ही म्हण प्रचलित झाली. आधीच ठरलेल्या इशाऱ्याप्रमाणे भेटीच्या वेळी तीन तोफांचे बार प्रतापगडावरून काढण्यात आले. खानाच्या छावणी जवळपासच्या झाडाझुडुपांमध्ये दडून बसलेल्या मावळ्यांनी हल्ला करून खानाच्या सैन्याची दाणादाण उडविली. खानाचा मुलगा फाजलखान आणि इतर काही सरदार लपूनछपून वाईच्या मुख्य छावणीपर्यंत आले. इथे खानाचा जनाना होता. ते पाठलागावर असलेल्या नेताजीच्या सैन्यापासून वाचण्यासाठी खजिना, हत्ती व इतर जड सामान टाकून विजापूरला जनान्यासकट पळाले. खानाच्या मृत्यूनंतर त्यांनी त्याच्या शवाचे अंत्यसंस्कार इस्लामी पद्धतीने केले. त्याची एक कबर प्रतापगडाच्या पायथ्याशी बांधली आणि त्या कबरीच्या कायम देखभालीची व्यवस्था केली. अफजलखानाच्या मृत्यूनंतर शिवाजीराजांनी दोरोजी नावाच्या सरदाराला कोकण पट्टीतील आणखी किल्ले आणि प्रदेश जिंकण्यास पाठवले. स्वतः राजे सातारा प्रांतात घुसून कोल्हापुरापर्यंत गेले व त्यांनी पन्हाळा जिंकून घेतला. नेताजीने त्याच्या सैन्यासह जवळपास विजापुरापर्यंत धडक मारली. आधुनिक काळात अफझलखानच्या मृत्यूचा हा दिवस शिवप्रताप दिन म्हणून साजरा केला जातो.

प्रकृती खालावत गेल्याने रायगडावर हनुमान जन्मोत्सवाच्या वेळी वयाच्या अवघ्या ५०व्या वर्षी दि.३ एप्रिल १६८० रोजी छ.शिवाजी महाराज मृत्युमुखी पडले. त्यांच्याबरोबर त्यांच्या चौथ्या पत्नी महाराणी पुतळाबाई सती गेल्या. एक उत्तम प्रशासक, उत्तम रयतेचे वाली, हिंदवी स्वराज्य संस्थापक, मराठा साम्राज्य संस्था विस्तारक, शक्तिशाली, निष्ठावान, शूरवीर, मावळ्यांची प्रेरणाशक्ती, जाज्वल्य पराक्रमाने इतिहास रचणारे राजे दृष्टीआड झाले होते. छ.शिवाजी महाराजांचे नाव प्रत्येक भारतीयांच्या हृदयमंदिरात असे सुवर्णाक्षरांनी कोरले गेले, की ते आजतागायत अधिकच झळाळून चमकू लागले आहे, हे सांगणे न लगेच!

छत्रपती शिवरायांच्या अनेक अविस्मरणीय स्मृतींना मानाचा लवून मुजरा

**श्रीकृष्णकुमार गोविंदा निकोडे**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त व्हॉ. नं. ९४२३७१४८८३.**

# विचारांच व्रत करता आल तर निर्विचार होण्यासाठी वेळ लागणार नाही

जीवनातील विविध दुःख, वेदना, अडचणी, समस्या,याच मुळ हे आपले विचार या साठी कारणीभूत आहेत.मग त्याचे परिणाम हे आपल्या शरीरासह जीवनावर पण होतात . त्यातुनच निद्रानाश , व्यसनाधीनता,उदयास येते .आपल आरोग्य उत्तम ठेवण्यात आपल्या विचारांच मोठं योगदान असतं . आणि हेच योगदान कायम आपल्या जीवनात राहव यासाठी आपण सतत विचार शुन्य राहता आलं पाहिजे.महणुन विचारांच काहूर थांबविण्यासाठी विचारांचं व्रत करा हाच संकल्प आपलं आयुष्य घडवु शकतो .विचारांचं व्रत जर आपल्याला करता आलं तर निर्विचार होण्यासाठी फार वेळ लागणार नाही.आणि आपलं जीवन निश्चितपणे सुखमय झाल्या शिवाय राहणार नाही. अनियंत्रित विचार हेच जीवनातील दुःखाचं मुख्य करणं आहे हेच मुख्य कारण समजुन घेऊन त्यावर नियंत्रण मिळवता येईल. अनियंत्रित विचारांना समुळ नष्ट करण्यासाठी आध्यत्मिक ज्ञान हा प्रभावी रामबाण उपाय आहे. आपल्याला अनियंत्रित विचारांवर नियंत्रण मिळवता आलं तर आयुष्य ब-यापैकी सोपं होतं . मुळात आपले अनियंत्रित विचार हेच आपले मुख्य शत्रु असतात.आपला शत्रु सुद्धा जे नुकसान करू शकणार नाही ते नुकसान आपले विचार करत असतात. आणि हे विचार कमी करता आले पाहिजे .अथवा त्याची गती कमी करता आली पाहिजे. जगातील सगळ्यात वेगवान काही असेल तर ते आपले विचार.अगदी क्षणात विचारांचा काहुर उत्पन्न होत आणि होत्याच नव्हत करून टाकत.जीवनात आपण वेगवेगळ्या पद्धतीचे व्रत उपवास करतो . श्रद्धा असो कि बळजबरीने आपण करतो मात्र हे निश्चित आहे.मग आपण विचारांचं व्रत उपवास केला तर आपल्याला निर्विचार होण्यासाठी फार वेळ लागणार नाही.बहुतांश लोक आपल्या डोक्यातील विचार चक्र थांबविण्यासाठी व्यसनाच्या आहारी जातात. पण कोणत्याही व्यसना शिवाय विचार शुन्य होता आलं पाहिजे अथवा विचारांचा प्रभाव आपल्यावर झाला नाही पाहिजे. त्या साठी आपलं ज्ञान आणि विवेक कमी येतात व आध्यत्मिक ज्ञान हा सगळ्यात खात्रीचा मार्ग आहे.या मार्गावर आपण जो पर्यंत मार्गक्रमण करतोय तो पर्यंत विचार चक्र आपल्यावर परिणाम करू शकत नाही. आत्मा अमर आहे शरिर नश्वर आहे. मानवी जीवनात काही निश्चित नाही. जन्म निश्चित नाही मृत्यु निश्चित नाही आपण येताना सोबत काही आणलं नाही.सोबत फक्त केलेले चांगले वाईट कर्म घेऊन जाणार आहेत. चांगले वाईट कर्म याला आपण सोप्या भाषेत पाप पुण्य असु संबोधु शकतो .मग निश्चित काही नाही सोबत संपत्ती,धन, द्रव्य,दारा, यापैकी काही येणार नाही.मग आपण दैनंदिन जीवनात संसारीक बाबींच्या अनुषंगाने चिंतातुर का असतो .तर आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचे घडामोडी याची तुलना आपण आपल्या जीवनाशी करतो .आणि मग नको त्या दुःखाला निमंत्रण देतो . मुळात दुःखाचं मुळ नष्ट करता आलं पाहिजे पण आपण तसं करत नाही तर वरवर प्रयत्न करतो .मग गडबड होते .हि गडबड होऊ नये म्हणून आपण आपल्या विचारांवर नियंत्रण मिळविण खुप आवश्यक आहे. त्यासाठी आपल्याला जास्तीत जास्त सत्याच्या मार्गावर मार्गक्रमण करण्याची आवश्यकता आहे.आणि ज्ञानाचा प्रकाश हा कायम आपल्या जीवनात तेवत ठेवता आला पाहिजे म्हणजे अनियंत्रित विचार जरी थांबवता आले नाही तरी हे विचार आपलं जास्तीच नुकसान करू शकणार नाहीत.त्यासाठी आपल्याला विचारांचं व्रत उपवास करण गरजेचे आहे. आपल्या हिताचे आहे लाभाचे आहे .आपल्या आयुष्यासाठी कल्याणकारी आहे.

**गणेश खाडे**
**९०११६३४३०१**

## पान १ वरुन

### लिलाव प्रक्रिया ...

यावेळी दमानिया यांनी केला असून बोली लावण्यासाठी तीन निविदा वीर किमान हवे असतांना येथे दोघेच होते. त्यामुळे ही लिलाव प्रक्रिया रद्द व्हायला हवी होती. यासाठी शेतकऱ्यांनी दाखल केलेल्या पिटीशन मध्ये इंटरप्रिटीशन दाखल करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच सर्वांना मिळून मोठा लढा उभारावा लागेल. मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना साखर कारखान्याबाबतचे मुद्दे दाखवू.

नांदेड -जालना समृद्धी महामार्गाबाबतही दमानिया यांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांचे नाव घेत ७० कोटी रुपये त्यांना घशात घालायचे होते म्हणून त्यांनी मार्गात बदल करून मार्ग कारखान्यात नेला असल्याचा आरोप केला. मात्र, आपण यासाठी लढा देऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करून जुन्या प्लान नुसारच महामार्ग व्हावा यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शेतकरी -कामगारांच्या प्रश्नांसाठी गरज पडल्यास मुंबईत आंदोलनाचा ईशारा देतांना त्यांनी आझाद मैदान ही उदासिन जागा आहे त्यामुळे या ठिकाणी उपोषण करत बसण्यात आता काही फायदा नाही सध्याच्या पुढाऱ्यांना भावना नाही. ते त्रास देतात. आंदोलने मोडीत काढतात. एसपी-डिसीपींचा वापर करतात. त्यामुळे या ठिकाणी आंदोलन न करता थेट मंत्रालय गाठून सर्वच्या सर्व गेट बंद करण्याचे वेगळ्या पद्धतीचे आंदोलन करण्याचा मानस व्यक्त करत त्यासाठी साखर कारखान्याशी संबंधीत सर्व शेतकरी व कामगार यांनी एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

आ. अर्जुन खोतकर यांची ईडी चौकशी सध्या थंड बस्त्यात आहे. ही चौकशी पून्हा योग्य पद्धतीने सुरु करण्यात यावी यासाठी मा. उच्च न्यायालयात धाव घेण्यार असल्याचेही दमानिया यांनी यावेळी सांगितले. तसेच येत्या २५ अथवा २६ तारखेला नक्की येणार असल्याचे आश्वासन अंजली दमानिया यांनी यावेळी दिले.

## पान १ वरुन

### जालन्यात मराठवाड्यातील ...

आयसीटी जालनाचे असोसिएट प्रोफेसर डॉ. आर. पी. नेमाडे, वेणूवेध बांबू संशोधन संस्था पुणेचे डॉ. हेमंत बेडेकर, कोनबॅक कुडाळचे संचालक संजीव करपे, महेश भवन ट्रस्टचे अध्यक्ष विजय दाड यांची उपस्थिती राहणार आहे.

या तीन दिवसीय प्रदर्शन व विक्री महोत्सवात विविध विषयावर चर्चासत्र होणार आहे. ११ एप्रिल रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत वेल्हा येथील तोरणा बांबू हस्तकला उद्योगचे निवृत्ती सुतार हे महिला बचत गटांना बांबू हस्तकला प्रशिक्षण देणार आहेत. १२ एप्रिल रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत वेणूवेध बांबू संशोधन संस्थेचे संचालक विनायक कोलते हे 'शेतकऱ्यांसाठी बांबू विक्री व व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करणार असून, दुपारी ३ ते ५ या वेळेत निवृत्ती सुतार हे महिला बचत गटांना बांबू हस्तकलेचे प्रशिक्षण देतील. सायंकाळी ५ ते ६.३० या वेळेत आयआयटी मुंबईचे डॉ. चारू कोरडे हे आर्किटेक्ट व सिव्हिल अभियंत्यांना बांधकाम क्षेत्रात बांबूचा उपयोग याबद्दल मार्गदर्शन करणार आहेत. १३ एप्रिल रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत निवृत्ती सुतार हे महिला बचत गटांना बांबू पुस्तकाला कला प्रशिक्षण देणार आहेत.

या प्रदर्शनात विविध बांबू उत्पादने जसे फर्निचर, शोपीस, दागिने, भांडी, हँडबॅग्ज इत्यादी पाहण्यासह विक्रीसाठी उपलब्ध असतील. पर्यावरणपूरक आणि टिकाऊ जीवनशैलीचा प्रसार करण्यासाठी हा उपक्रम मोलाचा ठरणार असल्याने मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन रानउद्योग फार्मर प्रोड्यूसर फार्मर कंपनी जालना आणि वेणूवेध बांबू संशोधन संस्था, पुणे यांच्यावतीने निमंत्रक डॉ. सुयोग कुलकर्णी, ड. भरत मंत्री, शैलेश बजाज, योगेश शिंदे, डॉ. सौ. मेधा जोशी, अतुल लड्डा, संजय लोंढे, राजेंद्र कोल्हे, शरद खेडेकर, धनश्री बेडेकर यांनी केले आहे.

# पुण्य क्षीण झाल कि आपोआप सद्बुद्धी लोप पावुन दुष्कर्म घडत

आपला जन्म हा मुख्यत्वे सत्कर्म करण्यासाठी झालेला असतो. पण संसारीक मायेच्या नादात आपण मुख्य उद्देश विसरतो. आणि असत्याच्या रथावर आपण अरूढ होतो मग हात रथ आपण कुठेच थांबवत नाही अथवा त्या मधुन खाली उतरत नाही मग शेवटी दुष्कर्म चक्र एवढं मोठं होतं कि आपला अभिमन्यू कधी झाला हे आपल्यालाच कळत नाही.महणुन दुष्कर्मा पासुन दुर रहणयसाठी आपली पाप पुण्य पातळी नियंत्रित ठेवा .सत्कर्म करण्यासाठी खुप खुप प्रयत्न करावे लागतात.जाणीव पुर्वक प्रयत्न करून सुद्धा बहुतांश वेळा सत्कर्म घडत नाही.पण दुष्कर्म एवढं सहजगत्या घडत कि आपल्या हातुन कधी दुष्कर्म घडलं याचा थांगपत्ता आपल्याच लागतं नाही .मग नेमकं कसं का होतं हे पण कधीतरी चिंतन करणं गरजेचं आहे. आयुष्यात कमवण्या सारखं काही जर असेल तर ते पुण्य असत.पण हेच पुण्य संचय करण्याकडं आपण कमालीचे दुर्लक्ष करतो . वारंवार आपली इच्छा झाली तरी सुद्धा पुण्य संचय होण्यात अथवा कर्म घडण्यात व्यत्यय येतातच. ज्या वेळी आपल्या आयुष्यातील पुण्य क्षीण होत त्या वेळी आपोआपच आपली बुद्धी भ्रष्ट होऊन दुष्कर्म घडत .मानलं तर सर्व काही असतं नाही मानलं तर काहिच नसतं पण सृष्टी वर अनेक वेगवेगळ्या जातींचे धर्मांचे संस्कृतीचे लोक वास्तव्यास आहेत . प्रत्येकाचं धर्म शास्त्र तत्त्वज्ञान वेगवेगळ असलं तरी प्रत्येक धर्म व्यक्ती हा शेवटी निसर्गाचं संचलन करणार्या अदभुत शक्ति पर्यंत येऊन थांबतो .या शक्तिच नाव जरी प्रत्येक धर्मात प्रत्येक व्यक्तिच्या लेखी वेगवेगळ असल तरी प्रत्येक धर्म हा सत्य, न्याय, या मजबुत पायावर उभा असल्याने पाप पुण्या भोवती फिरतोच.याची परीभाषा वेगळी असेल मुल्यमापन वेगळ असेल पण पाप पुण्य वगळून कोणाताही व्यक्ति धर्म पुर्ण होत नाही. एवढं मात्र नक्की खरं आहे.याची कबुली रोज नाही दिली तरी जीवनात एक दिवस व्यक्ती नक्की देतो .हे वास्तव आहे पाप पुण्य म्हणजे असं काही किलो तराजु घेऊन मोजत बसण्याच माध्यम नाही.पण दैनंदिन जीवनात आपल कार्य हे सत्यनिष्ठ, सत्य मार्गावर धर्म निष्ठा असेल त्याच बरोबर कोणत्याही जीवाला त्रासदायक ठरणार नाही या पद्धतीचे आचरण म्हणजे आपसुकच ते पुण्य कर्म असतं.असच कर्म दैनंदिन जीवनात घडण अपेक्षित असतं .पण भंपकपणा,खोटी प्रतिष्ठा, अंहकार स्वार्थ,मोह,माया,या छोट्या छोट्या भौतिक लोभापायी आपण कधी शिकर होतो आणि हातुन कधी पाप कर्म घडत हे कळत नाही. आपले दुर्गुण आपल्या पदरी पुण्य येऊ देत नाहीत.महणुन दुर्गुणांचा त्याग करा सद्गुण अंगिकारा पुण्य कर्म आपोआप घडेल. जीवाला पाप पुण्य कळतच असं नाही. त्या साठी योग्य असं वय आणि योग्य उंची सुद्धा आवश्यक असते .विस्तृत प्रकारे पाहिलं तर दैनंदिन जीवनात कर्म करत असताना आपल्या कर्माचा कोणालाही कसल्याही प्रकारचा त्रास होणार नाही एवढा आपला विवेक जागृत असेल तर आपल्या हातुन शक्यतो पाप कर्म होऊच शकत नाही. जीवनात आपल्या पदरी पुण्य संचय करता आला तर उत्तम कारणदुष्कर्म जाणीव पुर्वक कोणीही करत नाही. अथवा ते करावं अशी फारशी कोणाचीही जाणीव पुर्वक इच्छा नसते.पण पुण्य क्षीण झाल कि आपोआप सद्बुद्धी लोप पावतो आणि कधी दुष्कर्म आपल्या हातुन घडत हे आपल्या लक्षात पण येत नाही .आपला विवेक सदैव जागृत असला पाहिजे.सदगुणा पासुन दुर जात कामा नये.जेणेकरून दुर्गुण आपल्या वर त्यांचा प्रभाव निर्माण करणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे. आणि जर पुण्य क्षीण होऊ दिलं नाही तर आपल्या हातुन चुकुन सुद्धा दुष्कर्म घडणार नाही.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडेकर स्वाधार योजनेच्या विद्यार्थ्यांना त्रुटीची पुर्तता करण्याची शेवटची संधी

**जालना । प्रतिनिधी** - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविली जाते. सदर योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना देय असलेली रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा केली जाते.

या योजनेसाठी संबंधित लाभार्थ्यांना त्रुटी पुर्तता करण्याबाबत दि. २५ नोव्हेंबर, २०२४ रोजी पत्र संबंधीत लाभार्थ्यांच्या मुळ पत्त्यावर पाठविण्यात आलेले आहे.  तसेच दि. २४ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत, तसेच दुसऱ्यांदा दि. ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत आणि तिसऱ्या वेळेस दि. १५ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत अंतीम संधी त्रुटी पुर्तता करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

वरील आर्थिक वर्षातील विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत त्रुटी पुर्तता सादर न केल्यास सदरील अर्ज नस्तीबद्ध करण्यात येतील. व त्यानंतर सन २०२१-२२ ते सन २०२२-२३ या कालावधीतील कोणत्याही विद्यार्थ्यांना त्रुटी पुर्ततेची संधी दिली जाणार नाही. तसेच कोणताही विद्यार्थी स्वाधार योजनेच्या लाभापासून वंचीत राहिल्यास त्यास सदरील कार्यालय जबाबदार राहणार नाही, असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण जालना यांनी यापुर्वीच पत्राद्वारे केलेले आहे.

त्याअनुषंगाने सन २०२१-२२, सन २०२२-२३ वर्षामध्ये अर्ज सादर केलेल्या फ्रेश व नुतनीकरण ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत त्रुटीची पुर्तता केलेली नाही, अशा सर्व विद्यार्थ्यांच्या संचिका नस्तीबध्द करण्यात आलेल्या आहेत. याची लाभार्थ्यांनी नोंद घेण्याचे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.




